RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ३७

दि. २८ मे २०२६, वार : गुरूवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# लातूर पॅटर्नला बदनाम करण्याचे षडयंत्र खपवून घेणार नाही; विद्यार्थी, शिक्षक व व्यावसायिकांच्या पाठीशी ठाम: आमदार अमित देशमुख

## नीट पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर लातूरमध्ये व्यापक चिंतन बैठक संपन्न







**लातूर/प्रतिनिधी :** लातूर पॅटर्न हा विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि संस्थाचालक या सर्व घटकांनी अत्यंत परिश्रमपूर्वक घडवलेला आहे. नीट पेपरफुटीच्या प्रकरणात एखाद्याने चूक केली म्हणून संपूर्ण लातूर पॅटर्नच्या लौकिकाला धक्का लागला आहे, असे समजण्याचे काही कारण नाही. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू असून विषय न्यायप्रविष्ट आहे. यात जे कोणी दोषी असतील त्यांना कायद्याने कडक शिक्षा होईलच; परंतु तत्कालिक राजकीय फायद्यासाठी लातूरच्या लौकिकाला धक्का पोहोचेल अशी वक्तव्ये कोणीही करू नयेत. संकटसमयी आम्ही लातूरमधील विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि स्थानिक व्यावसायिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असा स्पष्ट व ठाम विश्वास राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिला.

परीक्षा पेपरफुटीच्या प्रकरणानंतर विद्यार्थी आणि पालकांमध्ये निर्माण झालेले भीती व संभ्रमाचे वातावरण दूर करण्यासाठी मंगळवार, दि. २६ मे रोजी सायंकाळी लातूर शहरातील अष्टविनायक मंदिराशेजारील गणेश हॉल (उद्योग भवन परिसर) येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने एका व्यापक चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीचे मुख्य नेतृत्व आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले. या वेळी त्यांनी ट्युशन क्लास, वसतिगृहे, झेरॉक्स व पुस्तक दुकाने, अभ्यासिकांचे चालक व मालक तसेच इतर संबंधित घटकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेतल्या.

**विद्यार्थ्यांनी घाबरू नये, पालकांनी निर्धास्त रहावे: आमदार अमित देशमुख**

या बैठकीत उपस्थित विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, लातूरमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अत्यंत प्रामाणिक आणि कष्टाळू आहेत. नीटची परीक्षा रद्द झाली किंवा पुनर्परीक्षा होणार म्हणून विद्यार्थ्यांनी अजिबात घाबरण्याचे कारण नाही. त्यांनी शांत राहून आणि पूर्ण आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे, त्यांना नक्कीच यश मिळेल. तसेच, आपल्या पाल्यांना शिक्षणासाठी लातूरला पाठवण्याची इच्छा बाळगून असलेल्या बाहेरील जिल्ह्यातील पालकांनीही पूर्णपणे निर्धास्त राहावे; विद्यार्थ्यांच्या भवितव्याला कोणतीही बाधा पोहोचणार नाही, याची काळजी प्रत्येक लातूरकर घेईल. लातूर हे शांत, सुरक्षित, सामाजिक एकोपा जोपासणारे आणि सकारात्मक विचारांचे शहर असून हे वैशिष्ट्य कायम जपले जाईल.

शहरातील व्यावसायिक आणि ट्युशन चालकांना धीर देताना आमदार देशमुख यांनी प्रशासनाला कडक इशारा दिला. उद्योग भवन असेल किंवा शहरातला इतर कुठलाही भाग, जर व्यावसायिक किंवा नागरिकांकडून काही तांत्रिक अनियमितता घडल्या असतील, तर शासकीय यंत्रणांनी त्या नियमानुसार दुरुस्त करून >> पान ३

## राष्ट्रवादीच्या कार्यकारणीतून तिघांचा पत्ता कट! सुनेत्रा पवार मोठा निर्णय, निवडणूक आयोगाकडे जाणाऱ्या यादीत कोणाची नावे?



**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या अंतर्गत वर्तुळात सध्या प्रचंड उलथापालथ आणि वेगवान राजकीय हालचाली सुरू आहेत. उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या मुंबईतील 'देवगिरी' या शासकीय निवासस्थानी काल झालेली प्रमुख नेत्यांची बैठक कमालीची वादळी ठरली होती. या बैठकीत पक्षातंर्गत झालेल्या घडामोडींवर चर्चा झाली. राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्यकारणीवरही चर्चा झाली असून पक्षाच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी मोठा निर्णय घेतल्याचे समोर आले आहे.

मंगळवारी झालेल्या राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या या बैठकीत ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांनी आपली नाराजी थेट आणि उघडपणे बोलून दाखवली होती. या संपूर्ण नाराजीनाट्यानंतर आता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी डॅमेज कंट्रोलसाठी एक अत्यंत महत्त्वाचा आणि मोठा निर्णय घेतला असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

पक्षाच्या नव्या कार्यकारिणीवरून सुरू झालेल्या या वादावर पडदा टाकण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आता आपली सुधारित नवीन यादी लवकरच निवडणूक आयोगाला सादर करणार आहे. यापूर्वी पाठवलेल्या यादीत ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या पदांचा कुठेही उल्लेख नव्हता, ज्यामुळे त्यांना पदावरून दूर केल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. शिवाय, अनेक नवख्या चेहऱ्यांना थेट कार्यकारिणीत स्थान दिल्याने पटेल आणि तटकरे कमालीचे नाराज होते.

कार्यकारणीतून तिघांचा पत्ता कट होणार?

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या ज्येष्ठ नेत्यांची नाराजी दूर करण्यासाठी उपमुख्यमंत्री आणि पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी नव्या यादीत मोठे फेरबदल करण्याचे ठरवले आहे. त्यानुसार, नवाब मलिक यांच्या कन्या सना मलिक यांच्याऐवजी आता थेट ज्येष्ठ नेते हसन मुश्रीफ यांना नवीन कार्यकारिणीत मोठी जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय सुबोध मोहिते आणि प्रजापती या नेत्यांना नवीन कार्यकारिणीतून थेट डच्चू दिला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## ज्येष्ठ पँथर श्रीहरी कांबळे यांच्या संघर्षपिटक या आत्मचरित्राचे रविवारी आ.संजय बनसोडे यांच्या हस्ते होणार प्रकाशन

**लातूर/प्रतिनिधी :** ज्येष्ठ पँथर,सामाजिक कार्यकर्ते श्रीहरी नरहरी कांबळे यांच्या संयमी जीवन अनुभवानी समृध्द अशा संघर्षपिटक या आत्मकथनाचे प्रकाशन रविवार,दि.३१ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डॉ.भालचंद्र रक्तपेढी सभागृह,लातूर येथे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या हस्ते होणार आहे.



ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ.सुरेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या प्रकाशन समारंभाला बाभळगावच्या कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कठारे,मसापचे जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ.जयद्रथ जाधव, मुंबईच्या साठ्ये महाविद्यालयातील प्रा.डॉ. गौतम टेंकाळे, महाराष्ट्र-गोवा बार असोचे उपाध्यक्ष ॲड.बळवंत जाधव, माजी महिला व बाल कल्याण उपायुक्त ॲड.वैभव सूर्यवंशी हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तरी या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला सामाजिक,राजकीय,साहित्य क्षेत्रातील श्रोत्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजन समितीचे प्रसेनजित कांबळे,सचिन हिंगे, संजय सुरवसे, प्रा.युवराज अंधोरीकर, प्रवीण सोमठाणेकर, प्रा.विनोद टेंकाळे, सुयोग सूर्यवंशी, जी.जी.कांबळे, मोहन कांबळे, दयानंद सिरसाटे, अमोल शिंदे, सिताराम कांबळे, अतुल काळे, संदीप साळवे, दयानंद कांबळे, राहलू काळे, किशोर वाघमारे, समाधान हिंगे, दत्तात्रय गायकवाड,साहील कांबळे, बाळू गादे, सिध्दांत मस्के, प्रतिक कांबळे, इंद्रप्रस्थ कांबळे, यशपाल कांबळे, तुषार आल्टे, सतिष सुरवसे, प्रदीप कांबळे इत्यादिंनी केले आहे.

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**लातूर/प्रतिनिधी :** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २० मे, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ३ जून, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## शरद पवार पुन्हा ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची प्रकृती ठीक नाहीये. काही दिवसांपूर्वी त्यांना रुबी हॉल क्लिनीकमध्ये ॲडमिट केलं होतं. तिथे चार ते पाच दिवस उपचार घेतल्यानंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला होता. तेव्हा डॉक्टरांनी पवारांना तब्येतीची विशेष काळजी घेण्याची सूचना दिली होती. त्यानंतर आता पुन्हा मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात शरद पवारां दाखल करण्यात आलं आहे. हे वृत्त समोर येताच राजकीय वर्तुळात आणि त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झालं आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शरद पवार यांच्या प्रकृतीत कोणतीही गंभीर समस्या उद्भवलेली नाही. ते केवळ नियमित वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात दाखल झाले आहेत. वाढते वय, सततचे दौरे आणि राजकीय-सामाजिक कार्यक्रमांमधील व्यस्त दिनक्रम यामुळे डॉक्टरांनी त्यांना काही आरोग्य चाचण्या करून घेण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्या चाचण्या सध्या सुरू आहेत.

## लातूर जिल्ह्यात शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

### स्वाधार योजनेसाठीही वसतिगृहाचा अर्ज बंधनकारक

**लातूर/प्रतिनिधी :** मसामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत मुलांची १४ व मुलींची १२ अशी एकूण २६ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. यामध्ये लातूर शहरात मुलांचे ६ तर मुलींचे ४ वसतिगृह; औसा, निलंगा, उदगीर, देवणी व चाकूर येथे प्रत्येकी मुलांचे १ व मुलींचे १; अहमदपूर येथे मुलांचे २ व मुलींचे २; तर रेणापूर येथे मुलांचे १ आणि जळकोट येथे मुलींचे १ वसतिगृह कार्यरत आहे. या सर्व वसतिगृहांची सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने सुरू झाली असून, पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरण्यासाठी https://hmas.mahait.orgया लिंकचा वापर करावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

या प्रवेश प्रक्रियेत जिल्ह्यात इयत्ता आठवी व अकरावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या, तसेच बिगर व्यावसायिक पदवी, पदविका (डिप्लोमा) प्रथम वर्षात आणि पदव्युत्तर प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) प्रवेश अर्ज भरता येईल. याशिवाय थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे. प्रवेश अर्ज भरण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना (इयत्ता ८ वी) ३० जून, २०२६ पर्यंत, तर कनिष्ठ महाविद्यालय व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना १५ जुलै, २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

या शासकीय वसतिगृहासाठी अर्ज करणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांचा जर जागेअभावी वसतिगृहात प्रवेश निश्चित झाला नाही, तर अशा पात्र विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा ऑनलाईन पद्धतीने लाभ देण्यात येणार आहे. त्यासाठी वसतिगृह प्रवेशासाठी निवड न झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन पद्धतीने वर्ग केले जाणार आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशाचा मूळ अर्ज भरलेला नाही, अशा विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा स्वतंत्र अर्ज सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रणालीमध्ये कोणतीही सुविधा देण्यात येणार नाही आणि पर्यायाने त्यांना स्वाधार योजनेचा लाभही मिळणार नाही. तरी इच्छुकांनी मुदतीपूर्वी ऑनलाईन लिंकचा वापर करून, तसेच स्थानिक गृहप्रमुख किंवा गृहपाल यांच्याशी संपर्क साधून आपले प्रवेश अर्ज निश्चित करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निकाल, निवडणूक आयोगाला एसआयआर करण्याचा पूर्ण अधिकार

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा निकाल दिला आहे. निवडणूक आयोगाच्या मतदार याद्यांची विशेष सखोल पुनर्निरीक्षण अर्थात एसआयआर करण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या अनेक याचिकांवर बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने आपला निकाल दिला. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांचा समावेश असलेल्या खंडपीठानं म्हटलं की, या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी नाही आणि तो निवडणूक आयोगाचा अधिकार आहे.

खंडपीठानं म्हटलं आहे केलं की, एसआयआर संदर्भात निवडणूक आयोगाचं अधिकार अबाधित आहेत. निवडणूक आयोगानं संपूर्ण कायदेशीर प्रक्रियेचे पालन केलं असून, ही प्रक्रिया देशभरात सुरू राहील. मतदारांचा समावेश करण्यास नकार देण्याचा अधिकार निवडणूक आयोगाने राखून ठेवला आहे, असं न्यायालयानं नमूद केलं. तसंच निवडणुका मुक्त आणि निष्पक्ष झाल्या पाहिजेत, असंही न्यायालयानं ठामपणे सांगितलं. दरम्यान, सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठानं या वर्षाच्या सुरुवातीला या प्रकरणी प्रदीर्घ सुनावणीनंतर निकाल राखून ठेवला होता. यानंतर बुधवारी खंडपीठानं आपला निकाल दिला. दरम्यान, या याचिकांमध्ये निवडणूक आयोगानं राबवलेल्या एसआयआर प्रक्रियेच्या कायदेशीर वैधतेला आव्हान देण्यात आलं आहे. घटनेचे कलम ३२६, लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५० आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियम ांनुसार, ही दुरुस्ती प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या अधिकारांच्या पलीकडे आहे, असा युक्तिवाद या याचिकांमध्ये करण्यात आला आहे.

हा वाद प्रामुख्याने भारतीय निवडणूक आयोगाच्या त्या अटीभोवती फिरतो, ज्यानुसार ज्या मतदारांची नावे २००२ च्या मतदार यादीत किंवा काही राज्यांमध्ये २००३ च्या मतदार यादीत नव्हती, त्यांना त्या मतदार यादीत नाव असलेल्या व्यक्तीशी असलेला आपला वंशपरंपरागत संबंध सिद्ध करणं आवश्यक आहे.

## माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या घेतल्या भेटी

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी नागरिक यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेऊन त्यांच्या निमंत्रनाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी माजी महापौर दीपक सुळ, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, वेंकटेश पुरी, गोविंद देशमुख, सुशील वाघमारे, गिरीश माने, रोहित माने, बापुराव देशमुख, अनिता कांबळे, परमेश्वर साळुंखे, वसंत शिंदे, बिभीषण घोडके, गोविंद कांबळे, धनराज पवार, डॉक्टर शशिकांत कुकाले, प्रीती कांबळे, संदीप सूर्यवंशी, शोभा ओहाळ, आशा धावारे, शंकर धावारे, रामराव मोरे, संदीप सूर्यवंशी, दिलीप कदम, सुधाकर माने, गणेश सूर्यवंशी, लक्ष्मण अंकुशे, उद्धव देशमुख, विनोद शिंदे, दिनेश कांबळे, गंगाधर जाधव, ज्योती देशमुख, जया डोपे, शीला श्रीरामे,



निशा गायकवाड, सुरेखा ननावरे, आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## संपादकीय...

## जागतिक व्यवस्थेत सुधारणांचा संदेश

सर्व प्रश्न सोडविण्यासाठी जागतिक व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा झाल्या पाहिजेत. संयुक्त राष्ट्र, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यातून ग्लोबल साऊथकडील देशांचा आवाज उमटला पाहिजे, हा विचार ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या परिषदेत बुलंदपणे मांडण्यात आला. थोडेसे मतभेद झाले; परंतु एकमतही घडून आले. अमेरिका आणि इराणमधील वाढता संघर्ष आणि जगभरात निर्माण झालेले संशयाचे वातावरण यामुळे कुठल्याही वैश्विक संघटनेत कमालीचे मतभेद होत आहेत आणि त्याची प्रचिती नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या शिखर परिषदेतून आली. ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या सतराव्या शिखर परिषदेतून सुद्धा बहुपक्षीय सुधारणा जागतिक आर्थिक स्थिरीकरण आणि पश्चिम आशियातील तणाव कमी करण्यासाठी एकमताने आवाहन करण्यात आले. भारताने भू-राजनैतिक मतभेदांवर यशस्वीपणे मात करून या आघाडीला ग्लोबल साऊथ संघटनांसाठी व्यावहारिक सहकार्याच्या दिशेने आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. परिषदेच्या शेवटी चर्चा आणि मंथन होऊन कोणतेही संयुक्त निवेदन तयार होऊ शकले नसले, तरी भारताने बजावलेली भूमिका निर्णायक ठरली. यावरून वाढत्या भू-राजनैतिक संघर्षाबाबत सदस्य राष्ट्रांमधील तीव्र अंतर्गत मतभेद अधोरेखित झाले. परंतु, एक अभंग एक संघ ब्रिक्स संघटना समान ध्येयवादाच्या आधारे एका सूत्रात मांडण्यात जयशंकर यांना यश आले. मतभेद असले तरीही समान विचार व तत्त्वांच्या आधारे संघटनेला पुढे नेण्यात जयशंकर यांना यश आले. ब्रिक्स सदस्य राष्ट्रांमध्ये एकमत घडविण्यासाठी आणि त्यांना आपल्या भूमिका विचारपूर्वक मांडण्यासाठी जयशंकर यांनी भाषणातून घडविलेले विचारमंथन खरोखरच नव्या जगापुढील जिवंत प्रश्नांचा वेध घेणारे म्हटले पाहिजे. त्यांनी भाषणामध्ये जगातील आजचे प्रश्न, त्यांच्याकडे पाहण्याचा एक रचनात्मक दृष्टिकोन आणि भारताची युद्ध व तणावाकडे पाहण्याची भूमिका याबाबत केलेले सडेतोड विश्लेषण खरोखरच विचार करायला लावणारे आहे.जयशंकर यांनी परिषदेत सदस्य राष्ट्रांत एकमत घडवून आणण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली. इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांनी या प्रश्नाकडे सगळ्यांचे लक्ष वेधले. त्यांचा रोख अमेरिका आणि इस्रायलकडे होता. जेव्हा हितसंबंधांचा संघर्ष येतो, तेव्हा मात्र दोन तीव्र टोकाची भूमिका घेणार्या देशांना एका समान मुद्द्यावर आणून सहमती घडविणे अवघड होते. या सत्याची प्रचिती इराणने घेतलेल्या भूमिकेवरून दिसून आली, असे असूनही भारताने प्रकाशित केलेल्या निवेदनातील सहमतीचे मुद्दे अत्यंत महत्त्वाचे आणि विचारप्रवर्तक आहे. संयुक्त निवेदनाऐवजी भारताने यजमान म्हणून स्वतःचे निवेदन घोषित केले व त्यात विचारमंथनाचा परामर्ष घेतला. संयुक्त घोषणांवर एकमत होऊ शकले नाही. जयशंकर आणि इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांच्यात सविस्तर चर्चा झाली. याप्रसंगी त्यांनी अमेरिका व इराणमध्ये भारत तटस्थ मध्यस्ताची भूमिका पार पाडू शकतो आणि युद्ध थांबवू शकतो, असे मत व्यक्त केले. रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्जेई लावरोव्ह यांनीही भारताने मध्यस्ताची भूमिका पार पाडावी, असे आवाहन केले.नव्या बहुध्रुवी जगात विकसनशील देशांचे हित व कल्याण लक्षात घेऊन दक्षिणेकडील देशांचे विकासप्रश्न बुलंदपणे मांडण्याची भूमिका भारताने अलीकडे सातत्याने घेतली आहे. त्यास अनुसरून जयशंकर यांनी भाषणातून ही भूमिका यथार्थपणे मांडली. सदस्यांनी जागतिक दक्षिणेकडील देशांच्या समस्यांवर भर दिला तसेच जागतिक प्रशासनामध्ये लवचिकता आणावी, नवीन सुधारणांचे महत्त्व लक्षात घ्यावे, या दृष्टीने भारताच्या भूमिकेचे बहुतेक समर्थन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बहुध्रुवी जगात ब्रिक्सची भूमिका कशी महत्त्वाची आहे, हे प्रकर्षाने नमूद केले. आगामी ब्रिक्स परिषदेचे यजमानपद भारताकडे असल्याने या परराष्ट्र मंत्र्यांच्या परिषदेस महत्त्व होते. सप्टेंबरमध्ये होणार्या ब्रिक्स शिखर परिषदेची उत्सुकता वाढली आहे. एस. जयशंकर यांनी आवाहन केले की, ब्रिक्स राष्ट्रांनी ग्लोबल साऊथकडील जगाला अधिक मजबूत व बुलंद आवाज देण्यासाठी बहुपक्षीय संस्थांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करावा. त्यांनी ब्रिक्स संघटनेचे व्हिजन मिशन स्पष्ट करून संघटनेचे महत्त्व प्रतिपादन केले आणि भविष्यकाळात ब्रिक्सची भूमिका अधिक निर्णायक होऊ शकते, असे सांगून जगातील ३० पेक्षा अधिक देशांनी ब्रिक्समध्ये सामील होण्याची इच्छा व्यक्त केल्याचे नमूद केले. जगातील युद्धे ताण-तणाव व संघर्ष यापेक्षाही विकसनशील देशांना संसाधनांचे जतन, संवर्धन, शाश्वत विकास, अन्नसुरक्षा प्रश्न यांचे गांभीर्य अधिक वाटते. तसेच ऊर्जा अन्नसुरक्षा, खतांचा पुरवठा, अन्नधान्यांच्या बाबतीत पुरवठा साखळी स्थिर करण्यासाठी करावयाचे प्रयत्न याबाबतीत सदस्य राष्ट्रांनी चर्चेत प्रामुख्याने लक्ष केंद्रित केले. तसेच पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी ब्रिक्स धान्य विनिमय केंद्र स्थापन करण्याच्या संदर्भात सुद्धा चर्चा केली. ब्रिक्स सारख्या व्यासपीठावरून शाश्वत विकासाचा मंत्र रुजविण्यात भारताने जे यश संपादन केले आहे, त्यामुळे दक्षिणेकडील छोट्या-छोट्या राष्ट्रांमध्ये भारताची विश्वसनीयता वाढली आहे आणि त्यामुळेच ३० देशांनी ब्रिक्स सदस्यत्व मिळविण्यासाठी धडपड सुरू केली आहे. आगामी दिल्ली बैठकीत हे ३० देश ब्रिक्स परिषदेत भाग घेतील आणि भारताचे त्यामुळे समर्थन अधिक भक्कम होईल. ब्रिक्स सदस्य राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांनी शिखर परिषदेबाबत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने प्रकाशित केलेला अहवाल अत्यंत सुस्पष्ट, दिशादर्शक आणि तेवढाच पथदर्शक आहे. त्यामध्ये सूत्ररूपाने असे म्हटले आहे की, जागतिक प्रशासकीय चौकट कालबाह्य झाली आहे आणि त्यात सुधारणा करण्याची हीच वेळ आहे. तसेच संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची पुनर्रचना सुद्धा करावी लागेल. पुढील सप्टेंबर महिन्यामध्ये भारताच्या अध्यक्षतेखाली होणार्या ब्रिक्स शिखर परिषदेमध्ये मांडावयाचे मुद्दे आणि प्राधान्यक्रम याबाबत झालेली चर्चा खरोखरच दिशादर्शक ठरली आहे. अमेरिका-इराण युद्धाबाबत थोडेसे मतभेद झाले असले तरी देखील मतभेदांचे मुद्दे बाजूला सारून विकासाच्या प्रश्नांवर कसे लक्ष दिले पाहिजे, याबाबत झालेली चर्चा ही खरोखरच निर्णायक ठरली आहे. वर्तमान आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याची हीच वेळ आहे व योग्य वेळ आहे, ही भूमिका भारताने घेतली. डॉलरप्रणीत अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला प्रतिशह देण्यासाठी ब्रिक्सच्या व्यासपीठावरून बुलंद आवाज प्रकट होईल आणि सप्टेंबर महिन्यात भारत अधिक सक्रिय, भक्कम आणि ठोस भूमिका घेईल, यात शंका नाही. भारताने दहशतवादाच्या विरोधात शून्य सहानुभूती धोरणाचा पुनरुच्चार केला तसेच विकासासाठी सामुदायिक पुरुषार्थ जोपासण्याचे आवाहनही केले आहे. जागतिक व्यवस्थेत सुधारणांचा आग्रह, हाच ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या शिखर परिषदेचा संदेश होय.

# बकरी ईद : त्याग, करुणा आणि माणुसकीचा खरा अर्थ





भारतीय समाजजीवनातील सण-उत्सव ही केवळ आनंदाची क्षणे नसतात तर ते समाजाच्या नैतिक मूल्यांची, सांस्कृतिक परंपरांची आणि मानवी नात्यांची पुनःप्रत्ययकारी स्मृती असतात. प्रत्येक सण माणसाला काहीतरी शिकवून जातो. काही सण आनंद शिकवतात, काही कृतज्ञता, काही एकात्मता, तर काही आत्मपरीक्षण. बकरी ईद, ज्याला ईद-उल-अजहा असेही म्हटले जाते, हा असाच एक सण आहे, जो केवळ धार्मिक विधींचा दिवस नसून त्याग, समर्पण, करुणा आणि सामाजिक जबाबदारी यांचे गहिरे तत्त्वज्ञान आपल्या समोर ठेवतो. आजच्या काळात सणांचे स्वरूप अनेकदा बाह्य दिखाऊपणाकडे झुकताना दिसते. उत्सवांचा अर्थ अनेकदा कपडे, सजावट, भोजन आणि औपचारिक शुभेच्छांपुरता मर्यादित होतो. अशा वेळी बकरी ईद आपल्याला आठवण करून देते की खरा सण बाह्य प्रदर्शनात नसतो; तो अंतर्मनातील मूल्यांच्या जागृतीत असतो.

बकरी ईदची प्रेरणा इस्लामी परंपरेतील एका अत्यंत अर्थपूर्ण प्रसंगातून मिळते. परमेश्वराच्या आदेशापुढे संपूर्ण समर्पण दाखवत इब्राहिम यांनी आपल्या सर्वांत प्रिय गोष्टीचाही त्याग करण्याची तयारी दाखवली. ही कथा केवळ धार्मिक आख्यायिका म्हणून पाहण्याची नाही. तिच्या गाभ्यात एक अत्यंत मानवी आणि सार्वकालिक प्रश्न आहे, माणूस स्वतःच्या स्वार्थापेक्षा मोठ्या मूल्यांसाठी किती तयार आहे? आज समाजासमोर याच प्रश्नाचे वेगळ्या रूपात पुनरागमन होत आहे. आपण विकासाच्या, आधुनिकतेच्या आणि प्रगतीच्या भाषा बोलतो, पण त्यागाची भाषा किती बोलतो? आपण अधिकारांची मागणी करतो, पण जबाबदारीचे भान किती ठेवतो? आपण सुखाच्या मागे धावतो; पण दुसऱ्याच्या दुःखात किती थांबतो?

बकरी ईदचा खरा संदेश याच ठिकाणी अधिक तेजस्वी होतो. या सणाचा केंद्रबिंदू म्हणजे 'कुर्बानी'. पण कुर्बानीचा अर्थ केवळ एका धार्मिक विधीपुरता मर्यादित ठेवणे हा त्याचा संकुचित अर्थ ठरेल. कुर्बानी म्हणजे आपल्या अहंकाराचा त्याग, लोभाचा त्याग, अन्यायकारक वृत्तीचा त्याग, स्वार्थाचा त्याग. दुसऱ्याच्या हितासाठी स्वतःच्या काही गोष्टी बाजूला ठेवण्याची तयारी म्हणजे कुर्बानी. आज समाजात तणाव वाढत आहेत. धर्म, जात, भाषा, प्रदेश, विचारधारा प्रत्येक ठिकाणी भिंती उभ्या राहताना दिसतात. संवाद कमी होतो आहे, संशय वाढतो आहे, सहजीवनाचे मूल्य कमकुवत होत आहे. अशा वेळी बकरी ईदचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. कारण हा सण सांगतो की श्रद्धा ही केवळ वैयक्तिक भक्ती नसते तर ती सामाजिक करुणेशी जोडलेली असली पाहिजे.

या सणातील आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे वाटणीची भावना. कुर्बानीतून मिळालेल्या अन्नाचा काही भाग गरीब, गरजू आणि वंचितांपर्यंत पोहोचवण्याची परंपरा ही केवळ धार्मिक आचारसंहिता नाही; ती सामाजिक न्यायाची जिवंत जाणीव आहे. आज जगभर संपत्ती वाढत आहे, पण विषमताही वाढत आहे. शहरांच्या आकाशाला भिडणाऱ्या इमारतींच्या सावलीत उपाशी पोटांची संख्या कमी झालेली नाही. विकासाच्या भाषणांबरोबरच बेरोजगारी, महागाई, असुरक्षितता आणि उपेक्षा यांचीही कठोर वास्तवता आहे. अशा वेळी बकरी ईद आपल्याला सांगते की उत्सव तेव्हाच पूर्ण होतो, जेव्हा आनंदाच्या ताटात दुसऱ्याचाही हक्क असतो. ही भावना अत्यंत महत्त्वाची आहे. कारण समाज केवळ कायद्यांनी टिकत नाही, तो संवेदनांनी टिकतो. संविधान समानतेचा मार्ग दाखवते, पण करुणा त्या मार्गावर चालण्याची नैतिक ताकद देते.

आजच्या सार्वजनिक जीवनात संवेदनशीलतेचा अभाव तीव्रतेने जाणवतो. राजकारणात कटुता वाढते आहे, सार्वजनिक चर्चेत सभ्यता कमी होते आहे, सामाजिक माध्यमांवर अपमानाची भाषा सामान्य झाली आहे. दुसऱ्याच्या वेदनेकडे पाहण्याची क्षमता कमी होत चालली आहे. अशा वातावरणात बकरी ईदचा संदेश केवळ एका समुदायापुरता मर्यादित राहत नाही, तो संपूर्ण समाजासाठी नैतिक धडा ठरतो. हा सण आपल्याला सांगतो धर्माचा खरा अर्थ विभाजनात नाही, तर माणुसकीत आहे. भारतीय समाजाची खरी ताकद त्याच्या विविधतेत आहे. इथे बकरी ईद, दिवाळी, ख्रिसमस, बुद्ध पौर्णिमा हे सर्व सण केवळ कॅलेंडरवरचे दिवस नसतात; ते परस्पर सन्मान आणि सहअस्तित्वाच्या संस्कृतीचे प्रतीक असतात. या भूमीची ताकद एकरूपतेत नाही; ती अनेकतेतून उभ्या राहिलेल्या ऐक्यात आहे. म्हणूनच बकरी ईदच्या निमित्ताने एक गोष्ट विशेषत्वाने लक्षात ठेवावी लागेल, धर्माचे बाह्य रूप समजणे सोपे असते; पण त्यातील मानवी गाभा समजून घेणे अधिक आवश्यक असते.

बकरी ईदचा मानवी गाभा स्पष्ट आहे: त्याग करा, वाटा, दुसऱ्याच्या दुःखात सहभागी व्हा आणि परमेश्वरापुढे नम्र राहा. आजच्या पिढीसमोर उपभोगवादाचे प्रचंड आकर्षण आहे. यशाची व्याख्या अनेकदा पैसा, प्रतिष्ठा आणि भौतिक साधनांमध्ये अडकलेली दिसते. स्पर्धा आहे, धावपळ आहे, तुलना आहे, असुरक्षितता आहे. अशा वेळी बकरी ईद एक वेगळाच प्रश्न विचारते, तुमच्याकडे किती आहे हे महत्त्वाचे नाही, तुम्ही किती वाटू शकता हे अधिक महत्त्वाचे आहे. हीच खरी नैतिक उंची आहे. या सणाच्या निमित्ताने कुटुंब, नातेवाईक, शेजारी, मित्र यांच्यात भेटीगाठी होतात. एकमेकांना शुभेच्छा दिल्या जातात. पण या भेटीगाठींच्या मागे एक मोठा सामाजिक अर्थ दडलेला आहे, नात्यांचे पुनरुज्जीवन. आजच्या काळात माणूस डिजिटलरीत्या जोडलेला आहे, पण भावनिकदृष्ट्या अनेकदा तुटलेला आहे. घरात माणसे आहेत, पण संवाद कमी आहे. समाजात गर्दी आहे, पण जवळीक कमी आहे. अशा वेळी सण हे नात्यांना पुन्हा उब देणारे प्रसंग ठरतात.

बकरी ईद आपल्याला हेही शिकवते की श्रद्धा आणि विवेक एकमेकांचे विरोधक नाहीत. खरी श्रद्धा माणसाला अधिक विनम्र, अधिक न्यायप्रिय आणि अधिक करुणामय बनवते. जर धर्म माणसाला दुसऱ्याचा द्वेष शिकवत असेल, तर तो धर्माचा आत्मा नसून त्याचे विकृत रूप आहे. आज जगाला सर्वांत जास्त गरज कोणत्या गोष्टीची आहे, तर ती आहे परस्पर विश्वासाची. धर्माच्या नावावर निर्माण होणारे तणाव, समाजमाध्यमांवर पसरवला जाणारा द्वेष, अफवांमधून पेटणारी अस्वस्थता, या सगळ्यांच्या काळात बकरी ईदचा संदेश अधिकच अर्थपूर्ण ठरतो. कारण हा सण आठवण करून देतो की खरी धार्मिकता माणसाला इतरांपासून दूर नेत नाही; ती त्याला अधिक जवळ आणते. या निमित्ताने समाजाने स्वतःलाही काही प्रश्न विचारायला हवेत.

आपल्या आनंदात दुसऱ्याचा वाटा आहे का? आपल्या श्रद्धेत करुणा आहे का? आपल्या समृद्धीत सामाजिक जबाबदारी आहे का? आणि सर्वांत महत्त्वाचे आपल्या धर्मात माणूस आहे का? हे प्रश्न केवळ तत्त्वज्ञानाचे नाहीत; ते लोकशाही समाजाच्या नैतिक आरोग्याशी संबंधित आहेत. बकरी ईदचा उत्सव मिरवणुकीत, सजावटीत किंवा औपचारिक शुभेच्छांत संपता कामा नये. तो आपल्या वर्तनात उतरला पाहिजे. जर या दिवशी आपण एखाद्या गरजवंताची मदत केली, एखाद्या उपाशी पोटी अन्न पोहोचवले, एखाद्या दुखावलेल्या नात्याला पुन्हा जुळवले, एखाद्या पूर्वग्रहाला मनातून काढून टाकले तरच या सणाचा आत्मा खऱ्या अर्थाने जिवंत राहील.

शेवटी, बकरी ईदचा संदेश अत्यंत साधा आहे, पण अत्यंत गहिरा आहे. मानवतेपेक्षा मोठा धर्म नाही. करुणेपेक्षा मोठी प्रार्थना नाही आणि वाटणीपेक्षा मोठा उत्सव नाही. बकरी ईदच्या या पवित्र निमित्ताने आपण असा संकल्प करूया की श्रद्धा असू द्या, पण त्यात नम्रता असू द्या, समृद्धी असू द्या, पण त्यात वाटणी असू द्या, मतभेद असू द्या, पण वैर नको. कारण शेवटी समाज महान होतो तो त्याच्या संपत्तीने नाही, तर त्याच्या संवेदनांनी. बकरी ईदच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यागाची जाणीव, करुणेची ऊब आणि माणुसकीचा प्रकाश आपल्या समाजात अधिक दृढ होत राहो, हीच मंगलकामना.



**प्रविण बागडे**
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

# कुर्बानी त्याग, आज्ञापालन आणि अल्लाहच्या प्रसन्नतेच्या भावनेचे प्रतीक




कुर्बानी म्हणजे केवळ एखाद्या जनावराची कत्तल नव्हे, तर ती त्याग, समर्पण, आज्ञाधारकता, निष्ठा आणि अल्लाह तआलाच्या प्रसन्नतेसाठी केलेल्या सर्वोच्च बलिदानाचे प्रतीक आहे. इस्लाममध्ये कुर्बानीची खरी भावना म्हणजे मनामध्ये तक्वा, प्रामाणिकपणा आणि अल्लाहच्या आदेशापुढे पूर्ण समर्पण निर्माण करणे होय. म्हणूनच कुर्बानीचा इतिहास आपल्याला हजरत इब्राहीम अलैहिस्सलाम आणि हजरत इस्माईल अलैहिस्सलाम यांच्या अतुलनीय त्यागाची आठवण करून देतो.

अल्लाह तआलाने हजरत इब्राहीम अलैहिस्सलाम यांना वृद्धापकाळात हजरत इस्माईल अलैहिस्सलाम यांसारखा आज्ञाधारक आणि सद्गुणी पुत्र प्रदान केला. प्रत्येक माणसाला आपली संतती अत्यंत प्रिय असते, विशेषतः दीर्घ प्रतीक्षेनंतर लाभलेली संतती. परंतु जेव्हा अल्लाह तआलाने आपल्या प्रिय खलील हजरत इब्राहीम अलैहिस्सलाम यांना स्वप्नाद्वारे आदेश दिला की, ''तुमची सर्वांत प्रिय वस्तू माझ्या मार्गात कुर्बान करा'', तेव्हा त्यांनी कोणतीही शंका न बाळगता आपल्या लाडक्या पुत्राच्या कुर्बानीसाठी स्वतःला तयार केले. ही केवळ एका वडिलांची परीक्षा नव्हती, तर ती पुत्राच्या आज्ञाधारकतेची आणि सबुरीचीही महान कसोटी होती. हजरत इब्राहीम अलैहिस्सलाम यांनी आपल्या पुत्राला सांगितले: ''हे माझ्या प्रिय पुत्रा! मी स्वप्नात पाहतो की मी तुला अल्लाहच्या मार्गात कुर्बान करीत आहे. आता तू सांग, तुझे मत काय आहे?'' त्यावर हजरत इस्माईल अलैहिस्सलाम म्हणाले: ''अब्बाजान! तुम्हाला जो आदेश देण्यात आला आहे तो पूर्ण करा. इंशाअल्लाह, तुम्ही मला सब्र करणाऱ्यांमध्ये आढळाल.''

हा संवाद महान संस्कार, दृढ ईमान आणि अल्लाहच्या निर्णयावर संपूर्ण समाधानाचे तेजस्वी उदाहरण आहे. एका बाजूला वडील अल्लाहच्या आदेशासाठी आपल्या सर्वांत प्रिय वस्तूचा त्याग करण्यास तयार आहेत, तर दुसऱ्या बाजूला पुत्रही अल्लाहच्या इच्छेसमोर पूर्ण समर्पित उभा आहे. हाच तो महान भाव आहे ज्यामुळे कुर्बानी हा ईमान, निष्ठा आणि त्यागाचा अमर संदेश ठरला. जेव्हा हजरत इब्राहीम अलैहिस्सलाम यांनी अल्लाहच्या आदेशाचे पालन करण्यासाठी आपल्या पुत्राला कुर्बान करण्याचा निश्चय पूर्ण केला,

तेव्हा अल्लाह तआलाने हजरत इस्माईल अलैहिस्सलाम यांच्या जागी जन्नतमधून एक मेंढा पाठविला आणि त्यांची ही महान परीक्षा यशस्वी ठरविली. कुरआन शरीफमध्ये या प्रसंगाला ''महान परीक्षा'' असे संबोधले आहे. या घटनेचा खरा संदेश असा आहे की माणसाने अल्लाहच्या प्रसन्नतेला आपल्या इच्छा, प्रेम आणि सांसारिक नात्यांपेक्षा अधिक महत्त्व द्यावे. कुर्बानी आपल्याला शिकवते की अल्लाहच्या धर्मासाठी, सत्यासाठी आणि न्यायासाठी जर आपल्याला आपली प्रिय वस्तू सोडावी लागली,

तरीही खरा मोमिन मागे हटत नाही. कुर्बानी म्हणजे केवळ जनावराची कत्तल नव्हे, तर आपल्या अहंकाराचा, वाईट इच्छांचा, लोभाचा, मत्सराचा आणि सर्व दुर्गुणांचा त्याग करणे हा तिचा खरा उद्देश आहे. आज गरज आहे ती कुर्बानीची खरी भावना समजून घेण्याची. जर आपल्या मनात त्याग, मानवता, बंधुभाव, अल्लाहची आज्ञाधारकता आणि तक्वा निर्माण होत नसेल, तर आपली कुर्बानी केवळ एक बाह्य कृती ठरेल. अल्लाह तआलापर्यंत ना मांस पोहोचते ना रक्त; त्याच्यापर्यंत पोहोचते ते फक्त बंद्यांचे तक्वा आणि प्रामाणिकपणा. कुर्बानी आपल्याला हेही शिकवते की पालकांनी आपल्या मुलांचे उत्तम धार्मिक आणि नैतिक संस्कार करावेत, जेणेकरून ते अल्लाह आणि त्याच्या रसूल यांच्या आज्ञांचे पालन करणारे बनतील. हजरत इस्माईल अलैहिस्सलाम यांची आज्ञाधारकता ही त्यांच्या उत्कृष्ट धार्मिक शिक्षणाचा परिणाम होती.

आजच्या भौतिकवादी युगात, जिथे माणूस आपल्या इच्छांचा गुलाम होत चालला आहे, तिथे कुर्बानीचा संदेश आपल्याला स्मरण करून देतो की खरी यशस्विता केवळ अल्लाहच्या प्रसन्नतेत आहे. जो मनुष्य अल्लाहच्या आदेशापुढे नतमस्तक होतो, अल्लाह तआला त्याला दुनियेत आणि आखिरतमध्ये सन्मान व यश प्रदान करतो. अल्लाह तआला आपल्याला कुर्बानीची खरी भावना समजून घेण्याची, प्रामाणिकपणे अमल करण्याची आणि हजरत इब्राहीम व हजरत इस्माईल अलैहिस्सलाम यांच्या आज्ञाधारकता व निष्ठेचा आदर्श आपल्या जीवनात उतरविण्याची तौफीक प्रदान करो.

-------------

**कबीर वाणी**
**म मुस्लिम कबीर, लातूर**
८२०८४३५४१४

## विविध वृत्त...

### केज येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**केज/प्रतिनिधी:** पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त केज येथील शिक्षक पतसंस्था, पंचायत समिती मैदान येथे गुरुवार रोजी सकाळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक उपक्रम आणि जयंती महोत्सव संपन्न होत आहे यामध्ये रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करावे असे आवाहन शिवमल्हार प्रतिष्ठान, जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष बालाजी गाढवे, उपाध्यक्ष अमोल भैरे, तात्या रोडे यांच्यासह जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### बकरी ईद वादात मिरा रोड येथील आंदोलनकर्त्यांना फडणवीसांचा दणका; पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल

**भाईंदर/प्रतिनिधी** : मिरा रोड येथील पूनम क्लस्टर गृहसंकुलात बकरीईद निमित्त आणलेल्या बकऱ्यांवरून निर्माण झालेल्या वादप्रकरणी आंदोलनकर्त्यांविरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जमावबंदी आदेशाचे उल्लंघन, प्राण्यांना अमानुष वागणूक देणे आणि मारहाण केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हस्तक्षेप केल्यानंतर पोलिसांनी कारवाई केल्याची चर्चा आहे. मिरा रोडमधील उच्चभ्रू पूनम क्लस्टर गृहसंकुलात बकरीईदच्या पार्श्वभूमीवर बकरे आणण्यात आले होते. त्यानंतर काही रहिवाशांनी बकरे इमारतीबाहेर काढण्याची मागणी केली. या मुद्द्यावरून सोसायटी पदाधिकारी आणि रहिवाशांमध्ये वाद निर्माण झाला होता.पुढे या प्रकरणात काही हिंदुत्ववादी संघटनांनी उडी घेत आंदोलन सुरू केले. मंगळवारी गृहसंकुलाबाहेर तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती.आंदोलनादरम्यान काही कार्यकर्त्यांनी बकरे बाहेर काढण्याची मागणी करत घोषणाबाजी केली. तसेच गृहसंकुल परिसरात तीन डुकरे आणण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना घडली.

याशिवाय एका मुस्लिम व्यक्तीला मारहाण झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आल्याने परिस्थिती नियंत्रणात राहिली.

पान १ वरुन...

### लातूर पॅटर्नला बदनाम करण्याचे षडयंत्र खपवून घेणार नाही; विद्यार्थी, शिक्षक व व्यावसायिकांच्या पाठीशी ठाम: आमदार अमित देशमुख

घ्याव्यात, त्यासाठी नागरिकांना वेठीस धरू नये. कायद्याच्या चौकटीत राहून व्यवसाय करणाऱ्यांना कुठल्याही यंत्रणेने विनाकारण त्रास दिल्यास ते प्रकार अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. लातूरचा शैक्षणिक केंद्र म्हणून अधिक विस्तार करण्यासाठी आगामी काळात येथे आणखी सोयी-सुविधा निर्माण केल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

लातूरचे खासदार डॉक्टर शिवाजी काळगे यांनी उपस्थित घटकांना धीर देताना सांगितले की, नीट पेपरफुटीचे प्रकरण जेव्हा समोर आले तेव्हा माझ्या मनाला खूप वेदना झाल्या. शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि संस्थाचालकांनी रक्ताचे पाणी करून लातूर पॅटर्न निर्माण केला आहे. आज उद्योग भवन परिसर हा लातूरच्या अर्थव्यवस्थेचा आणि शिक्षणाचा महत्त्वाचा भाग बनला आहे. सीबीआय आणि न्यायालय दोषींना कठोर शिक्षा देईलच; परंतु यात लातूरमधील सर्वसामान्य ट्यूशन चालक, विद्यार्थी आणि स्थानिक व्यावसायिकांचा काहीही दोष नाही. आम्ही येथील संपूर्ण व्यावसायिक आणि शैक्षणिक विश्वाच्या पाठीशी कायम आहोत. लातूर पॅटर्नला बदनाम करण्याचे षडयंत्र आता थांबले पाहिजे.

लातूर शहर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी लातूर पॅटर्नची बाजू भक्कमपणे मांडली. ते म्हणाले की, आज जाणून-बुजून लातूर पॅटर्नला नतदृष्ट मंडळी बदनाम करत आहेत. आजूबाजूच्या जिल्ह्यातील अनेक लोक लातुरात येऊन स्थायिक झाले आहेत. देशात कोटा आणि लातूर ही शहरे दर्जेदार शिक्षणासाठी प्रसिद्ध आहेत. चालू नीट पेपरफुटी प्रकरणात पुणे आणि इतर जिल्ह्यातील लोकांचाही सहभाग असल्याचे समोर आले आहे, असे असताना केवळ लातूरचेच नाव जास्त करून बदनाम केले जाणे दुर्दैवी आहे.

या महत्त्वपूर्ण चिंतन बैठकीस लातूरच्या महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, महापालिकेतील काँग्रेसचे गटनेते विजयकुमार साबदे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर (जळळेकर), माजी अध्यक्ष ॲड. किरण जाधव, लातूर को-ऑप इस्टेटचे अध्यक्ष अशोक लोया आणि उपाध्यक्ष अभय शहा यांची प्रमुख उपस्थिती होती.

याशिवाय प्राध्यापक विकास कदम, इसरार सगरे, अशोक गोविंदपुरकर, विष्णूदास धायगुडे, राजकुमार जाधव, व्यंकटेश पुरी, राम स्वामी, विजय जाधव, दत्ता जाधव, महादेव जाधव, नितीन पवार, विलास यादव, शार्दुल साळुंके, बालाजी पवार, सुदाम शिंदे, रघुवीर गोडभरले, संजय लड्डा, गणेश शिंदे, राजपाल भंडे आदींसह लातूर पॅटर्न कृती समितीचे विविध पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि लातूर पॅटर्नशी निगडित हजारो विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राध्यापक व व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अत्यंत महत्त्वाच्या विषयावरील चिंतन कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण प्रास्ताविक ॲडव्होकेट कालिदासराव देशपांडे यांनी केले. तर संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन प्राध्यापक डॉक्टर महादेव जाधव यांनी केले. बैठकीच्या शेवटी उपस्थित सर्वांचे आभार प्राध्यापक विकास कदम यांनी मानले. लातूरचे शैक्षणिक वैभव आणि हित जपण्यासाठी सर्वांनी संघटित राहण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# रक्षकच बनले भक्षक!; तपासी अधिकाऱ्याचे आरोपी सोबत मद्यपान!; केज पोलीसांचा महाप्रताप!

## ➤ न्याय देवताच आंधळी असेल तर गोरगरिबांनी न्याय मागायचा कुठे!
## ➤ आरोपीसह भ्रष्टाचारी तपासी अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करा – शुभंम मोरे

**केज/प्रतिनिधी:** केज शहरासह केज पोलिस ठाणे हद्दीत रोजच अन्याय अत्याचाराच्या घटना घडत असुन केज पोलिस ठाण्यातील काही पोलिस अधिकारी, कर्मचारी हे या घटनेतील आरोपीशी आर्थिक तडजोड करत आरोपी सोबत खाण्याची हौसमौज करताना दिसुन येत आहेत.मग अशा घटनेतील आरोपीशी तडजोड करुन हि केज सैल करायची आणि गोरगरीबावर पुन्हा कायद्याच्या माध्यमातून अन्याय करायचा असाच एकंदरीत प्रकार सध्या केज पोलिस ठाण्यात सुरू आहे. सदरील घटना अशी की केज पोलीस ठाणे येथील गु. र.नं.१८७/२०२६ गुन्ह्यातील आरोपी गोविंद किसनराव कोंबडे व तपासी अधिकारी श्री.वाघमारे आणि इतरांचे बिअरबारमध्ये मद्यपान करतानाचे सीसीटीव्ही फुटेज तपासून संबंधित दोषीवर कारवाई करण्यात यावी. व तपासी अधिकारी यांना तात्काळ निलंबित करावे. अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षक बीड, जिल्हा अधिकारी बीड, तहसीलदार केज यांच्याकडे,शुभम मोरे व अर्चना मोरे यांनी केली आहे.


याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी केज पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१८७/२०२६ नुसार आरोपी गोविंद किसनराव कोंबडे रा.महात्मा फुले नगर केज याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास हा हेड कानिस्टेबल राजू वाघमारे हे करत आहेत. सदर गुन्ह्यातील आरोपी गोविंद किसनराव कोंबडे यांच्या विरोधात केज पोलीस ठाणे येथे सदरील गुन्हा घडण्याच्या अगोदर व सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर अनेक एन.सी.आर. दाखल करण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर इतरही पोलीस ठाण्यात एन.सी.आर. गुन्हे नोंद आहेत. दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी गोविंद कोंबडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. परंतु सदर गुन्ह्याचे तपसी अधिकारी हेड कॉन्स्टेबल राजू वाघमारे हे फिर्यादीला विश्वासात न घेताच तपास करत आहेत. सदर गुन्हा दाखल झाल्यापासून तपास अधिकारी श्री. वाघमारे यांच्याकडून अद्यापही फिर्यादीला व त्यांच्या कुटुंबाला न्याय मिळाला नाही. या उलट दिनांक १८ मे रोजी सायं.७-४५ ते ९-०० वा. समरस तपासी अधिकारी श्री राजू वाघमारे व सदर गुन्ह्यातील आरोपी गोविंद कोंबडे आणि इतर एक व्यक्ती असे मिळून एकूण तिघेजण हे केज शहरातील मेन रोडवरील कानडीत चौकाच्या जवळ असलेले ईशान बिअरबार मध्ये मद्यपान करत होते. सदरील प्रकार हा त्या बिअरबार मधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झालेला आहे. तपासी अधिकारी वाघमारे हे आरोपी आणि इतर एका व्यक्तीच्या मध्यस्थीने संगणमत करून सदर प्रकरणातील आरोपी गोविंद कोंबडे याला अभय देण्याचे काम करत आहेत. सदरील आरोपी यांनी माननीय जिल्हा सत्र न्यायालय केज येथे अटकपूर्वक जामीन अर्ज केला होता. परंतु माननीय न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला आहे. तपासी अधिकारी श्री. वाघमारे यांच्याकडून सदर आरोपीला अटक करण्यात जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात येत आहे. व आम्हाला त्यांच्याकडून सतत उडवा उडवीची उत्तरे देण्यात आली आहेत. व तपसी अधिकारी हे वेळ मारून नेहण्याचे काम करत आहेत. आम्हाला त्यांच्याकडून न्याय मिळण्यापेक्षा आमच्यावर त्यांच्याकडून सतत अन्याय केला जात आहे. जर तपासी अधिकारी हे एका प्रकरणातील आरोपी व इतर लोकांसमवेत बारमध्ये बसून मद्यपान करून पार्टया करत आहेत. सदर प्रकार हा निंदनीय आहे. दिनांक १८ मे रोजी आरोपी




गोविंद कोंबडे व तपासी अधिकारी श्री वाघमारे आणि अन्य एक जण या सर्वांनी मिळून सदरील बारमध्ये मद्यपान केल्यानंतर आरोपी गोविंद कोंबडे यांनी आमच्या बीड रोडवरील दुकानासमोर येऊन दुकान मालक व मेडिकल वाले यांना दारू पिऊन त्रास दिला त्यानंतर लगेचच आमच्या घरी व दुकानाच्या गोडाऊन वर येऊन दगडफेक करून आम्हाला शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. सदर प्रकरणी आम्ही केज पोलीस ठाणे येथे एन.सी.आर. दाखल केला आहे. परंतु सदर प्रकरणातील तपासी अधिकारी यांच्या अभयामुळे व पाठबळामुळे आणि मध्यस्थी करणारा बिअरबार मधील व्यक्ती याचे पाठबळामुळे आरोपीचे मनोबल वाढत आहे. त्यास तपासी अधिकारी व सदर बार मधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेला इतर व्यक्ती हा सहकार्य करत असल्यामुळे आरोपी हा वारंवार आम्हाला जीवे मारण्याच्या धमक्या देत आहे. व भविष्यात सदरील आरोपी हा आम्हाला व आमच्या कुटुंबातील सदस्यांना जिवे मारू शकतो. ते नाकारता येत नाही. तसेच सदर गुन्हा दाखल झाल्यापासून तपासी अधिकारी व सदरील आरोपी हे आरोपीच्या दुकानात व इतर ठिकाणी मद्यपान करून पार्टया करत आहेत. हे आम्ही अनेक वेळा लांबून पाहिले परंतु ते यांचे चित्रीकरण करण्यात आलेले नाही. अथवा सीसीटीव्ही फुटेज नाहीत. परंतु दिनांक १८ मे चे सदरील बिअरबार मधील घटना ही त्या ठिकाणच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेली आहे. तपासी अधिकारी श्री. वाघमारे व आरोपी गोविंद कोंबडे आणि त्यांच्या पत्नीचे कॉल डिटेल्स, सी.डी.आर. तपासण्यात यावेत. अशा बेजबाबदार तपासी अधिकाऱ्यामुळे आमच्यासारख्या गोरगरीब नागरिकांवर अन्याय होत आहे. व अशा अधिकाऱ्यांमुळे आपल्या पोलीस प्रशासनाची प्रतिमा देखील मलीन होत आहे. म्हणून सदर प्रकरणी आपण तात्काळ चौकशी करून बेजबाबदार चौकशी अधिकारी हेड कॉन्स्टेबल राजू वाघमारे यांचे तात्काळ निलंबन करून त्यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, सदरील गुन्ह्यातील आरोपी गोविंद कोंबडे व तपासी अधिकारी श्री वाघमारे यांच्यात मध्यस्थी घडवून आणणारा व आरोपीला मदत करणारा सीसीटीव्ही फुटेज मध्ये कैद झालेल्या इतर व्यक्तीविरुद्ध देखील कायदेशीर कारवाई करण्यात यावी, दिनांक १८ मे २०२६ रोजीच्या दिलेल्या लेखी निवेदनाच्या मागणीनुसार कार्यवाही करण्यात यावी, गोविंद कोंबडे यांच्याकडून व त्याच्या मित्र परिवाराकडून अर्जदार व त्यांच्या कुटुंबाच्या जीवितास धोका निर्माण झालेला आहे. तसेच त्यांच्या व्यवसायाचे आर्थिक नुकसान केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही तपासी अधिकारी राजू वाघमारे यांची व पोलीस प्रशासनाची राहील, दिनांक १८ मे २०२६ रोजीच्या मागणी अर्जानुसार आरोपी गोविंद कोंबडे यास बीड जिल्ह्यातून तात्काळ हद्दपार करण्यात यावे. अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे मोरे कुटुंबीयांनी केली आहे. सदर मागणीचे निवेदन हे केज तहसीलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी स्वीकारले आहे. या निवेदनावर अर्चना पिंटू मोरे व शुभम उर्फ पिंटू मोरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. जर संबंधित तपासी अधिकारी यांचे तात्काळ निलंबन करून त्यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ न केल्यास व आरोपी गोविंद कोंबडे यांना बीड जिल्ह्यातून हद्दपार न केल्यास सोमवार दिनांक १ जून २०२६ रोजी अर्चना पिंटू मोरे या केज तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास बसणार आहेत.असा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाला दिला आहे. या निवेदनाच्या प्रती पोलीस अधीक्षक बीड, जिल्हाधिकारी बीड, अप्पर पोलीस अधीक्षक आंबेजोगाई, सहाय्यक पोलीस अधीक्षक केज, तहसीलदार केज, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे केज यांना दिल्या आहेत. या लेखी निवेदनावर अर्चना पिंटू मोरे व शुभम उर्फ राम मोरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### कव्हा येथील स्वामी दयानंद विद्यालयाचे ८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र







**लातूर/प्रतिनिधी** : जेएसपीएम संचालित स्वामी दयानंद विद्यालय कव्हा येथील इयत्ता ५ वी इयत्ता ८ वी मधील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र होऊन देदिप्यमान यश मिळवलेले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी इयत्ता ५ वी ८ वी मधील ८ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र होऊन स्वामी दयानंद विद्यालयाच्या लौकिकात भर पाडण्याचे कार्य केलेले आहे.

यामध्ये इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पास होऊन शिष्यवृत्ती परीक्षेस पात्र झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रबुध्द प्रविण भालेराव १९० गुण, मानसी बालाजी देशमुख १८२ गुण, युवराज गणेश अंकुशे १७० गुण, वैष्णवी विठ्ठल नळगिरे १६४ गुण, यशोदा बालाजी इरले १६४ गुण, विर सिध्दाजी माने १६० गुण घेऊन शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेले आहेत तर इयत्ता ८ वी मधून सरस्वती हणुमंत चिंताले १७६ गुण, संध्या नवनाथ कवरे १७४ गुण घेऊन शिष्यवृत्तीस पात्र झालेले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिवा तथा माजी जि.प.अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, संस्थेचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, संचालिका आदितीताई पाटील कव्हेकर, समन्वयक अनिरूध्द पाटील, शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील,समन्वयक विनोद जाधव, समन्वयक बापूसाहेब गोरे, ग्रामीण शैक्षणिक समन्वयक सरदार शेख, मुख्याध्यापिका अरूणा कांदे, उपमुख्याध्यापक मंडोळाप्पा थंबा, स्पर्धा परीक्षा प्रमुख आक्कलदिवे सर, सरवदे मॅडम, बाबासाहेब कदम, प्रमोद मोकाशे यांच्यासह शिक्षक, शिक्षिकेत्तर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### उष्णतेच्या तीव्र लाटेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे देशवासियांना महत्त्वाचं आवाहन

नवी दिल्ली : मोसमी पावसाने आगमनाची वर्दी दिली असली तरीही देशभरातील अनेक राज्यांत अजूनही तापमानाचा पारा प्रचंड वाढला आहे. २५ मे पासून 'नवतपा' सुरू झाल्याने उष्णता वाढली आहे. परिणामी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. उष्णतेमुळे आरोग्याच्या तक्रारी सुरू झाल्याने काळजी घेण्याचं आवाहन करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी स्वत:ची काळजी घ्यावी, असं आवाहन थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून करण्यात आलंय. त्यांनी यासंदर्भात आज सोशल मीडियावरून पोस्ट केली आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये तापमान सातत्याने वाढत आहे आणि त्यासोबतच दैनंदिन जीवनातील उन्हाळ्याच्या समस्याही वाढत आहेत असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जास्तीत जास्त काळजी घेण्याचं आवाहन केलं आहे. ते पुढे म्हणाले, कृपया स्वत:ला हायड्रेटेड ठेवा, घरातून बाहेर पडताना पाणी सोबत ठेवा. अशा हवामानात तुमची संवेदनशीलता हा देखील एक मोठा आधार ठरते. शक्य असल्यास, तहानलेल्या व्यक्तीला एक ग्लास पाणी नक्की द्या. मी अशा लोकांचे कौतुकही करेन जे आपल्या घराबाहेर आणि दुकानांबाहेर माठात पाणी ठेवतात, जेणेकरून कोणीही त्यातून पाणी पिऊ शकेल. अतिउष्णतेमुळे होणारा त्रास, जसे की चक्कर येणे, मळमळणे किंवा जास्त थकवा जाणवणे याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. जर तुमच्या आजूबाजूला एखादी व्यक्ती अचानक बेशुद्ध पडल्यासारखी झाली, तिला अशक्तपणा जाणवला किंवा ती आजारी असल्यासारखी दिसली, तर तिला त्वरित एखाद्या थंड आणि सावलीच्या ठिकाणी घेऊन जा. तिला पाणी, ओआरएस किंवा इतर द्रवपदार्थ द्या, ज्यामुळे शरीराला आराम मिळेल. मुले, वृद्ध आणि उन्हात काम करणारे लोक या कडक उन्हामुळे सर्वात जास्त प्रभावित होतात. वेळेवर लक्ष न दिल्यास ही परिस्थिती हीटस्ट्रोकसारख्या (उष्माघात) गंभीर समस्येचे रूप घेऊ शकते. अशा वेळी तुमची सतर्कता आणि काळजी कोणाचा तरी जीव वाचवू शकते'', असंही मोदी म्हणाले.

## मुख्यमंत्री समृध्दी पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत
# कुंबेफळ ग्रामपंचायतची जिल्हास्तरीय तपासणी संपन्न

**केज/प्रतिनिधी:** मुख्यमंत्री समृध्दी पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत केज तालुक्यातील कुंबेफळ ग्रामपंचायतची जिल्हास्तरीय तपासणी संपन्न झाली आहे. मुख्यमंत्री समृध्दी पंचायतराज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय तपासणी समिती पंचायत समिती मंगळवेढा जि.सोलापुर च्या समितीने दि.११ मे २०२६ रोजी विजयकुमार देशमुख गटविकास अधिकारी पंचायत समिती मंगळवेढा, अशोक नलावडे विस्तार अधिकारी, ज्ञानेश्वर जतकर आरजीएस यांनी केज तालुक्यातील कुंबेफळ ग्रामपंचायतची तपासणी केली होती.त्यामध्ये कुंबेफळ ग्रामपंचायतला प्रथम क्रमांक मिळाला. दि.२६ मे २०२६ रोजी जळगावचे मुख्यकार्यकारीअधिकारी करिष्मा नायर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब आकलडे यांनी जिल्हास्तरीय ग्रामपंचायत कुंबेफळ ता.केज ची तपासणी केली.

यामध्ये आरोग्य विभाग, अंगणवाडी,कृषी,बचत गट, तलाठी कार्यालय, वाचनालय, शिक्षण विभाग अंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेची पाहणी करून तपासणी केली.सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.सर्व अभिलेखे तपासले. कुंबेफळ ग्रामपंचायतने राबविलेले विविध उपक्रमांची पाहणी केली.

केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, शिक्षण विभागाचे बीड जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी मयुर मोदानी,केजचे गटशिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे,केज केंद्राचे केंद्रप्रमुख संजय चौरे, कुंबेफळ ग्रामपंचायतचे सरपंच अविनाश पांचाळ, उपसरपंच सौ.श्रध्दा थोरात, विष्णु आबा थोरात, ग्रामविकास अधिकारी श्रीमती रेवती भोसले मॅडम, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. शालु थोरात,डाटा ऑपरेटर संदीप थोरात, मनोज थोरात,कुंबेफळ ग्रामपंचायतचे सर्व कर्मचारी, ग्रामपंचायत सदस्य,जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची




शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक राजाभाऊ कदम, प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ. रामकिशन मुळे,गणित विज्ञानचे प्राथमिक पदवीधर शिक्षक संदीप ठोंबरे, आदर्श शिक्षक आकाश लोंढे, आदर्श शिक्षक आबासाहेब धपाटे, राहुल बबचुटे, श्रीमती निलावती भोरे मॅडम, श्रीमती अंजली उटीकर मॅडम,अंगणवाडी ताई, मदतनीस,पीएम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार सौ.स्वर्णमाला पवार, सौ.अनिता पवार, विद्यार्थी उपस्थित होते. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेची या समितीने सर्व सुविधांची पाहणी करून कसून तपासणी करून सखोल मार्गदर्शन केले व समाधान व्यक्त केले.

## रामी, रामु ते महामाता रमाई....
## महामाता रमाईचे सामाजिक मातृत्व

रत्नागिरी जिल्हा हा रत्नांची खाण ! या जिल्ह्याने अनेक महान रत्न भारताला दिली. दापोली तालुक्यातील वणंद हे महामाता रमाईचे माहेर गाव. तसेच मंडणगड तालुक्यातील अंबडवे हे सासर . जणू या तांबड्या मातीने शोषितपणाचा गुण जन्मजात दिलेला. ''महामाता'' हा शब्द फक्त जन्म देणाऱ्या आईसाठी नसतो, तर समाजाच्या उन्नतीसाठी स्वतःचे जीवन अर्पण करणाऱ्या स्त्रीसाठी वापरला जातो. रमाई यांना ''महामाता'' म्हटले जाते, कारण त्यांचे मातृत्व केवळ आपल्या मुलांपुरते मर्यादित नव्हते, तर ते संपूर्ण समाजापर्यंत पोहोचलेले होते.



रमाईंच्या जीवनात वैयक्तिक दुःख खूप होते . गरिबी, लेकरांचे निधन, कुटुंबातील संकटे. तरीही त्यांनी स्वतःच्या दुःखाला प्राधान्य दिले नाही. त्यांनी बाबासाहेबांना शिक्षण घेण्यासाठी, समाजासाठी लढण्यासाठी मोकळे केले. त्यांच्या या त्यागामुळेच बाबासाहेब समाजक्रांती घडवू शकले. म्हणजेच रमाईंच्या सहनशीलतेमुळे आणि पाठिंब्यामुळे कोट्यवधी वंचित लोकांना न्याय आणि हक्क मिळवण्याचा मार्ग खुला झाला.आई आपल्या मुलासाठी जे करते, तेच रमाईने समाजासाठी केले. त्यांनी स्वतः उपाशी राहून बाबासाहेबांचा अभ्यास चालू राहावा याची काळजी घेतली. स्वतःच्या दुःखातही पतीला धीर दिला.कधीही त्यांच्या कार्यात अडथळा आणला नाही.ही वृत्ती म्हणजे सामाजिक मातृत्व ! जिथे स्त्री आपल्या कुटुंबापलीकडे जाऊन समाजाच्या कल्याणाचा विचार करते. रमाईंचे मातृत्व रक्ताच्या नात्यांपुरते मर्यादित नव्हते तर ; ते मानवतेशी जोडलेले मातृत्व होते. त्यांनी आपल्या वैयक्तिक आयुष्याचे सुख गमावले, पण समाजाला उज्ज्वल भविष्य मिळवून देण्यासाठी योगदान दिले. म्हणूनच त्या फक्त बाबासाहेबांच्या पत्नी नव्हत्या, तर समाजाच्या उभारणीतील ''आई'' होत्या. रमाईंचे जीवन दाखवते की आईपण फक्त लेकरांना वाढवण्यात नसते, तर समाजाला घडवण्यातही असते. त्यांच्या त्याग, प्रेम आणि सहनशीलतेमुळे त्यांना ''महामाता'' ही उपाधी प्राप्त झाली. त्यांचे मातृत्व हे सामाजिक मातृत्वाचे तेजस्वी उदाहरण आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्यामागे ज्या शांत, संयमी आणि त्यागमूर्ती रमाईंचा वाटा आहे, रमाईंच्या जीवनातील सौंदर्य हे त्यांच्या मनात, कष्टात आणि निःस्वार्थ प्रेमात दडलेले होते. रमाई अत्यंत गरिबीत वाढल्या. लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरपले. शिक्षणाची संधी मिळाली नाही, पण जीवनाने त्यांना खूप काही शिकवले. दुःख सहन करण्याची ताकद आणि संकटातही हसत राहण्याची वृत्ती हे त्यांच्या जीवनाचे मोठे सौंदर्य होते. बाबासाहेब शिक्षणासाठी परदेशी गेले तेव्हा घरची सर्व जबाबदारी रमाईवर होती. घरात दारिद्र्य, मुलांचे आजार, अन्नाची कमतरता तरीही त्यांनी कधी तक्रार केली नाही. ''तुम्ही शिका, मोठे व्हा, समाजासाठी काम करा'' असे म्हणून त्यांनी बाबासाहेबांना नेहमी धीर दिला. पतीच्या स्वप्नांसाठी स्वतःची स्वप्ने बाजूला ठेवणे ,हाच त्यांच्या जीवनातील खरा गोडवा होता.रमाईंचे साधेपण हे त्यांच्या सौंदर्याचे आणखी एक रूप होते. त्यांना ना दागिने हवे होते, ना सुखसोयी. त्यांना फक्त आपल्या पतीचे यश आणि समाजाची प्रगती हवी होती. त्या अत्यंत श्रद्धाळू, शांत आणि प्रेमळ स्वभावाच्या होत्या. घरातील सर्वांना जपणे, मदत करणे, आणि पतीच्या कार्यात अडथळा येऊ न देणे हे त्यांचे रोजचे कर्तव्य होते.हे सामान्य स्त्रीला शक्य नाही. म्हणूनच त्या केवळ पत्नी नव्हत्या, तर बाबासाहेबांच्या कार्याच्या पायाभरणीतल्या एक भक्कम शक्ती होत्या . त्याग, प्रेम, सहनशीलता आणि निष्ठा या गुणांनी रमाईंचे जीवन तेजस्वी झाले.

रमाईचे जीवन संघर्षाची कहाणी आहे, अनेक अर्थांनी त्याहूनही वेदनादायी कहाणी म्हणजे माता रमाई त्यांच्या वाट्याला आलेले दुःख हे सामान्य माणसाला खचवणारे होते. तरीही त्या ढळल्या नाहीत. उलट त्या बाबासाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. हे त्यांचे धैर्य नेमके कोणत्या प्रेरणेतून आले, याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. रमाई लहान असतानाच त्यांच्या डोक्यावरचे आई-वडिलांचे छत्र हरपले. बालपणीच अनाथ होण्याचे दुःख त्यांनी अनुभवले. बालवयातच जीवनाने त्यांना कठोर वास्तव दाखवले. लाड, माया, सुरक्षितता याऐवजी त्यांच्या आयुष्यात संघर्ष, अभाव आणि असुरक्षितता आली. अशा परिस्थितीत वाढलेल्या रमाईंच्या मनात सहनशीलतेची आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची ताकद निर्माण झाली. हीच त्यांच्या आयुष्याची पहिली प्रेरणा ठरली. लग्नानंतरही त्यांचे दुःख थांबले नाही. सासरे रामजी बाबांचे निधन झाले. घरातील आधारस्तंभ हरपल्यामुळे जबाबदाऱ्या अधिक वाढल्या. आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. घर, संसार, मुलांची काळजी याचे सर्व ओझे रमाईंच्या खांद्यावर आले. पण त्यांनी हे ओझे कधीही तक्रार न करता स्वीकारले.रमाईंच्या जीवनातील सर्वात वेदनादायी प्रसंग म्हणजे चार लेकरांचे निधन. आईसाठी लेकरं म्हणजे तिचं हृदय असतं. स्वतःच्या मुलांना एकामागून एक गमावणे, हे असह्य दुःख आहे. अशा दुःखाने अनेक स्त्रिया कोसळल्या असत्या. पण रमाई कोसळल्या नाहीत. त्यांनी अश्रू पुसले आणि पुन्हा उभ्या राहिल्या. कारण त्यांना एक मोठं ध्येय दिसत होतं , ते म्हणजे,बाबासाहेबांचे शिक्षण आणि त्यांचं समाजकारण. त्यांनी बाबासाहेबांना कधीही खचू दिले नाही. उलट त्यांना धीर दिला. ''तुम्ही शिका, मोठे व्हा, समाजासाठी काम करा.''ही प्रेरणा कुठून आली? ही प्रेरणा आली होती त्यांच्या पतीवरील अपार प्रेमातून, त्यांच्या त्यागी स्वभावातून, आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे समाजासाठी काहीतरी मोठं घडत आहे याच्या जाणिवेतून. त्यांना समजलं होतं की बाबासाहेब फक्त आपल्या कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या उद्धारासाठी झटत आहेत. म्हणून त्यांनी स्वतःचं वैयक्तिक दुःख बाजूला ठेवलं.पतीच्या ध्येयावर असलेला विश्वास, स्वतःच्या दुःखापेक्षा समाजाच्या भल्याला दिलेलं महत्त्व आणि निःस्वार्थ प्रेम यामुळे त्यांच्या आयुष्यातील दुःखांनी त्यांना तोडले नाही, तर अधिक मजबूत केले. त्या दुःखातूनच त्यांची अंतःशक्ती निर्माण झाली. त्या खंबीर राहिल्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्यात शांतपणे साथ देत राहिल्या. आजच्या आधुनिक स्त्रीसाठी त्यांच्या जीवनातून अनेक महत्त्वाचे बोध घेण्यासारखे आहेत. संकटातही धैर्य न सोडणे. रमाईंच्या आयुष्यात गरिबी, कुटुंबातील मृत्यू, मुलांचे दुःख असे अनेक आघात आले. तरीही त्या खचल्या नाहीत. आजच्या स्त्रीनेही जीवनातील अडचणींना घाबरून न जाता धैर्याने सामोरे जाणे शिकावे. दुसर म्हणजे ध्येयासाठी त्याग करण्याची तयारी. रमाईंनी स्वतःचे सुख बाजूला ठेवून बाबासाहेबांच्या शिक्षणाला आणि कार्याला महत्त्व दिले. आजच्या स्त्रीनेही आपल्या कुटुंबाच्या, समाजाच्या आणि स्वतःच्या प्रगतीसाठी कष्ट करण्याची तयारी ठेवावी.तिसरी गोष्ट म्हणजे साधेपणा आणि निःस्वार्थ प्रेम. आधुनिक जीवनात भौतिक सुखांना जास्त महत्त्व दिले जाते, पण रमाईंचे जीवन दाखवते की खरे समाधान प्रेम, निष्ठा आणि मूल्यांमध्ये असते. तसेच, रमाईंच्या जीवनातून स्त्रीची अंतःशक्ती किती महान असते हे समजते. स्त्री फक्त घर सांभाळणारी नसून ती कुटुंबाची आणि समाजाच्या प्रगतीची आधारशक्ती असते. आधुनिक स्त्रीने रमाईंच्या जीवनातून धैर्य, त्याग, सहनशीलता, प्रेम आणि कर्तव्यनिष्ठा हे गुण घ्यावेत. अशा मूल्यांनीच स्त्रीचे जीवन खऱ्या अर्थाने सुंदर आणि अर्थपूर्ण बनते. जयंती प्रत्यार्थ महामाऊली रामांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन..

**-किशोर कासारे**
**मंडणगड दाभट**
८७६७४२५१८०

# माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी शेतकरी कामगार पक्षाचे नेते ॲड. उदय गवारे कुटुंबियांचे केले सांत्वन

**लातूर/प्रतिनिधी** : शेतकरी कामगार पक्षाचे नेते ॲड. उदय गवारे यांच्या मातोश्री श्रीमती सुलोचना गोवींदराव गवारे यांचे नुकतेच निधन झाले आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी लातूर शहरातील ॲड. उदय गोविंदराव गवारे यांच्या निवासस्थानी जाऊन सुलोचना गोविंदराव गवारे यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केले, भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांचे पुत्र ॲड. उदय गवारे व गवारे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला.



यावेळी लातूर शहर महानगरपालिकेचे माजी महापौर दीपक सूळ, स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, आदिमाया उदय गवारे, ॲड. अभिलाषा उदय गवारे, डॉ. अनमोल उदय गवारे, मारुती बिरादार, डॉ. श्रीरंग बिरादार, गिरीश ब्याळे, अभिषेक पतंगे, युनूस मोमीन, व्यंकटेश पुरी, महादेव उबाळे, अभिजीत अंकलकोटे, किशोर जाधव, ॲड. सुनील गायकवाड आदींसह गवारे कुटुंबीय उपस्थित होते.

## लातूरात राज्यस्तरीय ऑन लाईन चर्चासत्राचे आयोजन; विविध तज्ञ मान्यवरांचा सहभाग

**लातूर/प्रतिनिधी** : आंबेडकराईट बुद्धिस्ट कम्युनिटी कोलाब्रेशन प्लॅटफॉर्मवर गुरुवार दि.२८.०५.२०२६ रोजी सायंकाळी ७.०० ते १०.०० वा. या वेळेमध्ये महाराष्ट्र शासनाच्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या उपवर्गीकरण करण्याच्या मनुवादी षडयंत्रा विरोधात राज्यस्तरीय ऑनलाईन चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.




यामध्ये आनंदराज आंबेडकर (प्रमुख रिपब्लिकन सेना), नितीन राऊत (माजी मंत्री, महाराष्ट्र), डॉ. सुखदेव थोरात (माजी अध्यक्ष UGC), अनिल वैद्य (माजी न्यायाधीश), डॉ. यशवंत मनोहर (साहित्यिक), ई. झेड. खोब्रागडे (माजी IAS अधिकारी), मधू कांबळे (पत्रकार, लोकसत्ता), डॉ. प्रदीप आगलावे (साहित्यिक), डॉ. सुरेश वाघमारे (विचारवंत, लातूर), डॉ. संदेश वाघ (मुंबई विद्यापीठ), डॉ. भारत पाटणकर (विचारवंत, कोल्हापूर), डॉ. जि.के. डोंगरगावकर (प्राचार्य), डॉ. संजयकुमार कांबळे (विचारवंत, पुणे), राज्यातील विचारवंत, नेते व कार्यकर्ते आदि मान्यवरांचे ऑन लाइन मार्गदर्शन होणार आहे.

यासाठी https://us06web.zoom.us/j/81400762896?pwd=HYKwUune0bGgvQnrcF-yK7DbB-MkFJ.1 Meeting ID: 814 0076 2896,Passcode: 12345 यावर जॉइन होण्याचे आवाहन आयोजक भिक्खु पय्यानंद थेरो, मुख्य समन्वयक डॉ. सुरेश वाघमारे, (जेष्ठ विचारवंत, लातूर) आणि सह आयोजक डॉ. बाळासाहेब गोडबोले, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, जि. एस. साबळे, डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले आहे.

## उद्धव ठाकरे गटाला मोठे खिंडार; प्रमुख पदाधिकाऱ्यांसह ४४ वर्षे जुन्या शाखाप्रमुखांचा भाजपमध्ये प्रवेश

वसई : वसई विरार शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मोठा धक्का बसला आहे. ठाकरे गटाच्या युवासेनेचे पालघर जिल्हाप्रमुख सिद्धेश रवींद्र जोगळे यांच्यासह सलग ४४ वर्षे पक्षा एकनिष्ठ राहिलेले ज्येष्ठ शाखाप्रमुख प्रभाकर गोपाळ पाटील आणि अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनी भाजप मध्ये प्रवेश केला आहे. मंगळवारी मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयात हा पक्ष प्रवेश पार पडला.

नुकताच पार पडलेल्या वसई विरार महापालिका निवडणुकीत भाजप सत्तेत जरी आले नसले तरी ४४ जागा जिंकत मोठे यश मिळविले आहे. या यशानंतर भाजपने संघटना बांधणी अधिक मजबूत करण्यासाठीच्या हालचाली सुद्धा सुरू केल्या आहेत.

विविध राजकीय पक्षात नाराज असलेले कार्यकर्ते व प्रमुख पदाधिकारी यांना आपल्या पक्षात खेचण्याचे काम सुरू आहे.

नुकताच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या गटात नाराज असलेल्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी भाजप मध्ये पक्षप्रवेश केला आहे. ?भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये केवळ तरुण नेतृत्वच नव्हे, तर पक्षाचा जुना आणि विश्वासू चेहरा मानले जाणारे प्रभाकर गोपाळ पाटील यांचाही समावेश आहे. पाटील हे १९८२ पासून २०२६ पर्यत, म्हणजेच सलग ४४ वर्षे गावराईपाडा शिवसेना शाखाप्रमुख म्हणून कार्यरत होते.

त्यांच्यासोबतच वसई-विरार महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २९ मधील उमेदवार सोनल रवींद्र जोगळे, पेल्हारचे विभागप्रमुख दिलीप कुवेसकर, वसई जमादार आळीचे विभागप्रमुख मनीष गायकवाड, उपविभागप्रमुख जितेश पवार, युवासेना शाखा अधिकारी (पापडी) आसिफ पठाण आणि शैलेंद्र गोलवणकर यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व सामाजिक क्षेत्रातील प्रतिनिधींनी भाजपचा झेंडा हाती घेतला आहे.

हा पक्ष प्रवेश सोहळा भाजप नेते व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ.हेमंत सवरा, भाजप महाराष्ट्र प्रदेश महामंत्री सुनील राणे, भाजप प्रदेश युवा मोर्चा अध्यक्ष कृष्णराज महाडिक, माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, नगरसेवक गणेश पाटील, विनीत तिवारी यासह इतर भाजपचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या पक्षप्रवेशामुळे ठाकरे गटाच्या संघटनात्मक रचनेला मोठे खिंडार पडल्याचे मानले जात आहे.

## शेतकऱ्यांना मोठा दिलासा; शेळ्या-मेंढ्यांतील गोट पॉक्सवर पुण्याच्या संस्थेची स्वदेशी लस: देशातील पहिली ठरली शासकीय संस्था



**पुणे/प्रतिनिधी** : शेळ्या व मेंढ्यांमध्ये होणाऱ्या देवी (गोट पॉक्स) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाला आतापर्यत खासगी कंपन्यांकडून एक कोटीहून अधिक लसी खरेदी कराव्या लागत होत्या. मात्र, पुण्यातील पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेनं गोट पॉक्सवरील लस विकसित केली असून, या लसीच्या उत्पादनासाठी परवाना मिळवणारी ही देशातील पहिली शासकीय संस्था ठरली आहे. त्यामुळं येत्या काळात जनावरांना याच शासकीय लसीचा डोस देण्यात येणार आहे. पुण्यातील औंध येथील पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेत गेल्या चार वर्षापासून गोट पॉक्सवरील लस विकसित करण्याचं काम सुरू होतं. आता ही लस पूर्णपणे तयार झाली असून, लवकरच केंद्र सरकारची अंतिम मान्यता मिळणार आहे. पावसाळ्यापूर्वीच ही लस शेतकऱ्यांच्या जनावरांना देण्यात येणार आहे. याबाबत माहिती देताना पशुवैद्यकीय जैविक औषध निर्मिती संस्थेचे सहआयुक्त डॉ. याह्याखान पठाण म्हणाले की, ''गोट पॉक्स आणि लम्पी आजारावरील लसींसाठी आतापर्यत खासगी कंपन्यांवर अवलंबून राहावं लागत होतं. त्यामुळं अनेक पशुधनांना या रोगांचा फटका बसत होता. त्यामुळं आपल्याकडेही स्वत:चे तंत्रज्ञान आणि लस असावी, या उद्देशानं केंद्रातील 'इन्स्टिट्यूट ऑफ व्हेटर्नरी रिसर्च' संस्थेकडून तंत्रज्ञान घेण्यात आलं. तसेच पुण्यातील जैविक संस्थेतील शास्त्रज्ञांना विशेष प्रशिक्षण देण्यात आलं. त्यानंतर ही लस विकसित करण्यात आली.

लसींचे प्रायोगिक बॅच तयार केल्यानंतर त्यांची गुणवत्ता तपासणी आणि मानक चाचण्यांसाठी तीन बॅचेस बरेली येथील 'बायोलॉजिकल स्टँडर्डायझेशन डिव्हिजन'कडं पाठवण्यात आल्या होत्या. त्यानंतर महाराष्ट्रातील पाच शासकीय फार्मवर प्रत्यक्ष क्षेत्रीय चाचण्या घेण्यात आल्या. यामध्ये ५०० गोवंशीय जनावरे आणि १०० म्हशींना ही लस देण्यात आली. राष्ट्रीय विषाणू संस्था आणि केंद्रीय पथकानं या प्रक्रियेचं काळजीपूर्वक निरीक्षण केलं. यानंतर केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटना आणि लोकल लायसन्सिंग अथॉरिटीकडून व्यावसायिक उत्पादनाचा परवाना मिळाला. येत्या ३० मेपर्यत बरेलीच्या केंद्रीय संस्थेकडून अंतिम अहवाल प्राप्त होईल. त्यानंतर जून २०२६ च्या पहिल्या आठवड्यापासून ही लस थेट शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पोहोचवण्यास सुरुवात होईल, असं डॉ. पठाण यांनी सांगितलं.

ते पुढे म्हणाले की, यापूर्वी गोट पॉक्ससाठी दोन खासगी संस्थांकडून लसी खरेदी करण्यात येत होत्या. राज्यात साधारणपणे १ कोटी १५ लाख डोसची आवश्यकता भासत होती. यासाठी शासनाला जवळपास ५ कोटी रुपयांहून अधिक खर्च करावा लागत होता. मात्र, आम्ही विकसित केलेल्या लसीचा उत्पादन खर्च अत्यंत कमी आहे. बाहेरील लस २० ते ३० रुपये प्रति डोस दराने मिळत होती, तर आमची लस अवघ्या ६ ते ७ रुपये प्रति डोस खर्चात तयार होत आहे. त्यामुळं शासनाचा मोठा खर्च वाचणार आहे.

आतापर्यत गोट पॉक्स लसीचे १३ ते १४ बॅच यशस्वीरित्या तयार करण्यात आलं असून, त्याद्वारे सुमारे ५० ते ५५ लाख डोस उपलब्ध झाले आहेत. संस्थेकडून लम्पीवरील लसीची निर्मिती प्रक्रिया देखील सुरू आहे.

लम्पी लसीच्या चाचण्या पूर्ण झाल्या असून, परवाना प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. पुढील दोन ते तीन महिन्यांत आवश्यक निकष व परवानग्या मिळतील. त्यानंतर नोव्हेंबर ते डिसेंबर २०२६ पर्यत लम्पीवरील मूळ लस महाराष्ट्रातील पशुधनासाठी उपलब्ध होईल,'' असंही डॉ. पठाण यांनी सांगितलं.

## हरियाणात ४ आणि ५ जून रोजी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि कलावैभवाचा अविष्कार

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्राची समृद्ध लोकपरंपरा, वैविध्यपूर्ण लोकसंस्कृती आणि पारंपरिक कलावैभव राष्ट्रीयस्तरावर पोहोचविण्याच्या उद्देशाने 'लोकायन लोकोत्सव' या विशेष सांस्कृतिक महोत्सवाचे हरियाणातील गुरुग्राम येथे ४ व ५ जून २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे.



महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सहकार्याने आणि 'लोकायन सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक व बहुउद्देशीय संस्था, मुंबई' यांच्या सहयोगाने हा दोन दिवसीय सांस्कृतिक सोहळा पार पडणार आहे. गुरुग्राम येथील एसजीटी युनिव्हर्सिटीत ४ व ५ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होईल. या लोकोत्सवामध्ये महाराष्ट्रातील विविध पारंपरिक; तसेच प्रयोगात्म लोककलांचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

राज्याच्या सांस्कृतिक वैभवाची ओळख देशाच्या विविध भागांपर्यंत पोहोचविण्यासोबतच लोककला जतन व संवर्धनाचा संदेश या माध्यमातून दिला जाणार आहे. महाराष्ट्रातील विविध भागांतील नामांकित लोककलावंत यात सहभागी होऊन पारंपरिक लोकनृत्य, लोकसंगीत, पोवाडे, भारूड, गोंधळ, लावणी, दिंडी, लोकनाट्य, आदिवासी लोककला; तसेच आधुनिक प्रयोगशील लोककलांचे सादरीकरण करणार आहेत. महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीतील जीवनमूल्ये, परंपरा, लोकसंवेदना आणि सामाजिक आशय या कलाविष्कारांतून प्रभावीपणे मांडण्यात येणार आहेत.

'लोकायन लोकोत्सव' हा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा एक वैचारिक आणि कलात्मक उपक्रम ठरणार आहे. विविध कलाप्रकारांमधून भारतीय संस्कृतीतील विविधतेत एकता, सामाजिक समरसता आणि लोककलांचे जतन या मूल्यांचा संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार, यांच्या संकल्पनेतून; तसेच सांस्कृतिक कार्य सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील लोककला राष्ट्रीयस्तरावर सादर करून कलावंतांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, नव्या पिढीला लोकपरंपरांशी जोडणे आणि सांस्कृतिक देवाणघेवाण अधिक बळकट करणे हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश आहे. गुरुग्राम येथील रसिक प्रेक्षकांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा अनोखा अनुभव या निमित्ताने घेता येणार आहे.या सांस्कृतिक महोत्सवाला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराष्ट्राच्या लोककला आणि लोकसंस्कृतीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.